

## 'आम्ही भाग्यवंत!'

आम्ही भाग्यवंत । म्हणूनी लाभले ।
शिक्षक चांगले । शाळेमध्ये ॥१॥

ममतेचा निर्झर । त्यांच्या ह्रदयात ।
प्रेमाचा तो हात । पाठीवर ॥२॥

होता चूक काही । शिक्षा मिळे थोर ।
काळीज कठोर । भल्यासाठी ॥३॥

विद्यार्थ्यांचे हित । सदा मनी ध्यास ।
ज्ञानदान भाव । तयांमध्ये ॥४॥

रोवी कधी मनी । बीजे संस्काराची ।
केली जीवनाची । मूल्ये पक्की ॥५॥

शिक्षकी पेशाचा । राखियला मान ।
दिले आम्हां भान । जगण्याचे ॥६॥

ऐसा आम्हांस । भेटे भाग्यवंती ।
आठवूया स्मृती । नंदा म्हणे ॥७॥

— प्रा. डॉ. नंदा संतोष हरम
९३७२९१७३०८

( शिक्षक दिनाच्या निमित्ताने )